# मित्राचा खुन करून पळुन जात असलेल्या आरोपीस मोठया शिताफीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोंदीया येथुन ताब्यात घेतले.



दिनांक ११.०९.२०१९ रोजी दुपारी ०२:०० वाजता चे दरम्यान नियंत्रण कक्ष नागपूर (ग्रामिण) येथे माहिती प्राप्त झाली की, पोलीस ठाणे बुटीबोरी, जि. (नागपूर ग्रामिण) येथे श्री दत्त विद्यामंदिर शाळेजवळील स्वीमींग पुलाजवळील इमारत बांधकाम करणाऱ्या मजुरांचे एका झोपडीत एका इसमाचा खुन झालेला आहे. अशा प्राप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी रवाना झाले.

घटनास्थळी भेट दिल्यांनतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला बाजुचे झोपडीत राहणाऱ्या इतर मजुरांव्दारे माहिती मिळाली की, मृतक नामे कण ऊर्फ करणा दिनगर बाग, वय २३ वर्ष, रा. कंदेरी, पोस्ट सालईमुडगा, त. कंटावाणी, पो.स्टे. तुरेकला, जि. बलांगीर, राज्य उडीसा व आरोपीत नामे तिलकचंद्र चेरू बाग, वय २५ वर्ष, रा. कंदेरी, पोस्ट सालईमुडगा, त. कंटावाणी, पो.स्टे. तुरेकला, जि. बलांगीर, राज्य उडीसा हे दोघेही एकाचा झोपडीत वास्तव्यास असुन, दिनांक १०.०९.२०१९ चे रात्री ०९:३० वाजताचे दरम्यान मृतक हे झोपडीत हजर असतांना आरोपीत हा बाहेरून आला. त्यावेळी मृतक याने आरोपी यास “ तु कामपर भी नही जाता कम से कम खाना तो बनाकर रखा करो ” असे आरोपीस म्हटले असता, त्याचा राग मनात धरून आरोपी याने आजुबाजूचे झोपडीतील सर्व जण झोपी गेल्यांनतर दिनांक १०.०९.२०१९ चे रात्री ११:०० वाजता ते दिनांक ११.०९.२०१९ चे पहाटे ०३:०० वाजता दरम्यान आरोपीने लोखंडी रोडने व सीमेंट कॉन्क्रेटचा ब्लॉकने डोक्यावर वार करून

खुन केला व घटनास्थळावरून रात्रीच पळुन गेल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपीचे वर्णन फक्त पोलीसांना प्राप्त झाले. परंतु त्याचे कोणतेही छायाचीत्र पोलीसांना मिळु शकले नाही.

आरोपी हा उडीसा येथे राहणारा असल्याने, तो त्याचे मुळ गावी पळुन जाईल या तर्काचे आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांनी त्यांचे नेतृत्वात तात्काळ तीन पथक नेमुण आरोपीचे शोधकामी रवाना केले. प्रथमतः बुटीबोरी परिसर, अजनी रेल्वे स्टेशन, मुख्य बसस्थानक, खाजगी ट्रॅव्हल्स स्टेशन इत्यादी ठिकाणी आरोपीचा शोध घेण्यात आला. त्यांनतर मुख्य रेल्वे स्थानकावर आरोपीचा शोध घेत असतांना, पोलीसांना माहिती प्राप्त झाली की, आरोपी हा



शालीमार एक्सप्रेस मध्ये बसुन त्याचे गावाचे दिशेने रवाना झालेला आहे. त्याप्रमाणे पोलीसांचे एक पथक तात्काळ शालीमार एक्सप्रेसचे स्टेशन असलेल्या गोंदीयाचे दिशेने रवाना करण्यात आले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांनी तात्काळ नागपूर लोहमार्ग पोलीसांचे गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक शाम बडप यांना संपर्क करून आरोपीचे वर्णन सांगुन गोंदीया रेल्वे स्थानकावर थांबलेल्या शालीमार एक्सप्रेस मधुन आरोपी यास ताब्यात घेण्याबाबत कळविले. त्यावरून गोंदीया लोहमार्ग पोलीसांचे पथकाने फक्त आरोपीचे वर्णनावरून त्यास धावत्या ट्रेनमधुन ताब्यात घेतले. अशाप्रकारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोंदीया येथुन आरोपीस ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयांसंबंधाने सखोल विचारपूस केली असता, त्याने खुनाची कबुली दिली.

सदर खुनाचे घटनेवरून फिर्यादी नामे सुरेश खजनता महीर, वय १९ वर्श, रा. ठेलगुडोंगरी, पोस्टे खडीआर, ता.जि. नवापडा, उडीसा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बुटीबारी येथे अप. क्र. ६१८/२०१९, कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन, पुढील तपास पोलीस ठाणे बुटीबोरी हे करित आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), मा. श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण) यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. अनिल जिट्टावार, सपोनि श्री. जितेंद्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोउपनि सचिन मत्ते, पोहवा राजेंद्र सनोडीया, नाना राउत, महेश जाधव, गजेंद्र चौधरी, नापोशि रामा आडे, सुरेश गाते, पोशि अमोल वाघ, सचिन राठोड, योगेश राजगीरे, चालक सफौ. साहेबराव बहाळे, पोहवा भाऊराव खंडाते यांचे पथकाने लोहमार्ग गोंदीया चे पोलीस निरीक्षक अनिता खेडकर, पोउपनि प्रविण भिमटे, पोशि अनिल गजबे, सचिन भोयर यांचे मदतीने केली आहे.



<u>तपासी अधिकारी</u>
पोनि.श्री.आसिफराजा बी. शेख
ठाणेदार, पोलीस स्टेशन बुट्टीबोरी